# <u>प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे ६८ वे न्यायालय, बोरीवली, मुंबई.</u>

संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ६८०४९७६/पीएस/२०२३
गुन्हा क्रमांक – २१७/२०२२

**<u>नि. १ वर आदेश.</u>**

आरोपीने स्वतःहुन त्याचा गुन्हा कबूल केला आहे. त्याने त्याची कमीत कमी दंडावर मुक्तता करण्यात यावी अशी या न्यायालयास विनंती केली आहे. मी आरोपीला त्याचेवर कोणाचा दबाव आहे काय? व तो स्वतःहुन गुन्हा कबूल करतो आहे काय? अशी विचारणा केली व गुन्हा कबूल केल्यास त्यास शिक्षा होऊ शकते याची कल्पना दिली व त्यास पुर्नविचार करण्याची संधी दिली, परंतू, तो त्याचेवर कोणचाही दबाव नाही व त्याला स्वतःहुन गुन्हा कबूल करावयाचा आहे असे कथन करीत आहे. यावरुन हे स्पष्ट होते की, आरोपी स्वतःहुन गुन्हा कबूल करीत आहे व त्याचेवर कोणाचाही दबाव नाही. करीता मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**: <u>आ दे श</u> :**

१. फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २५२ अंतर्गत आरोपीला भारतीय दंड संहिताचे कलम २७९ खाली शिक्षापात्र अपराधासाठी दोषी धरण्यात येत आहे व त्याला ५००/– रूपये (पाचशे रूपये फक्त) द्रव्यदंडाची शिक्षा सुनावण्यात येत आहे व आरोपीने द्रव्यदंडाची रक्कम न भरल्यास त्याला १५ (पंधरा) दिवसांचे साधे कारावासाची शिक्षा ठोठावण्यात यावी.

२. फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २५२ अंतर्गत आरोपीला मोटर वाहन कायदा अधिनयमचे कलम ११९ सह १७७ खाली शिक्षापात्र अपराधासाठी दोषी धरण्यात येत आहे व त्याला २५०/– रूपये (दोनशे पन्नास रूपये फक्त) द्रव्यदंडाची शिक्षा सुनावण्यात येत आहे व आरोपीने द्रव्यदंडाची रक्कम न भरल्यास त्याला ५ (पाच) दिवसांचे साधे कारावासाची शिक्षा ठोठावण्यात यावी.

३. फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २५२ अंतर्गत आरोपीला मोटर वाहन कायदा अधिनयमचे कलम १८४ खाली शिक्षापात्र अपराधासाठी दोषी धरण्यात येत आहे व त्याला ५००/– रूपये (पाचशे रूपये फक्त) द्रव्यदंडाची शिक्षा सुनावण्यात येत आहे व आरोपीने द्रव्यदंडाची रक्कम न भरल्यास त्याला ७ (सात) दिवसांचे साधे कारावासाची शिक्षा ठोठावण्यात यावी.

४. आरोपीला आदेशाची प्रमाणित प्रत विनामूल्य पुरविण्यात यावी.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषीत केला)

**सही/–**
**( व्ही. एफ. चौगुले )**
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी
६८ वे न्यायालय, बोरीवली, मुंबई.

दिनांक : २७/०७/२०२४